# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व
## विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| **पीक व वाण** | : | **काकडी** |
|---|---|---|
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २००५** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | कोकणातील हलक्या वरकस जमिनीत काकडी पिकाचे जास्तीत जास्त हेक्टरी उत्पादन आणि अधिक फायद्यासाठी काकडी पिकाची लागवड पावसाची सुरुवात होताच करावी अशी शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१२** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | कोकणात खरीप हंगामातील काकडी पिकामध्ये बुरशीजन्य केवडा रोगाच्या व्यवस्थापनासाठी पिकाची लागवड करतांना जमिनीवर गिरीपुष्पाचे आच्छादन करुन त्यावर वेल सोडावेत. तसेच पिक फुलोऱ्यावर येताच मेटॅलाक्झिल अधिक मॅन्काझेब या बुरशीनाशकाची ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लि.) याप्रमाणे फवारणी करावी. तसेच १५ दिवसांच्या अंतराने कॉपरऑक्झीक्लोराईड ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर) या बुरशीनाशकाच्या दोन फवारण्या करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१६** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकणात खरीप हंगामामध्ये संकरीत काकडीपासून सर्वाधिक उत्पादन मिळण्यासाठी हेक्टरी १५ टन शेणखताबरोबर २५० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. |